दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

Epaper : https://hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ ❀ वर्ष : ०१ ❀ अंक : १ ❀ पाने : ८ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


**विशेष संपादकीय**

## हिंदू प्रकाश वार्ता राष्ट्रहित साधेल सर्वथा.. !

छत्रपती संभाजीनगर हे शहर मराठवाड्याच्या राजधानीचे शहर आहे. एवढेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या नजरेत भरणारे हे शहर आहे. या शहराला पर्यटनस्थळ म्हणून मान्यता आहेच. हे शहर आगळेवेगळेच आहे. या अशा शहरातून हिंदू प्रकाश वार्ता या नावाचे एक नवे दैनिक आम्ही सुरु करत आहोत. १९ एप्रिल रोजी अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहुर्तावर या दैनिकाचा प्रकाशन सोहळा अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे, याचा आम्हांला अत्यानंद आहे. अनेक मान्यवर, अनेक वाचक, हितचिंतकांची उपस्थिती लाभणार असल्याने या दैनिकाच्या वाटचालीच्या पहिला दिवसापासूनच वैचारिक, सामाजिक आणि बौद्धिक मंथन सुरु राहील ! दैनिक सुरु करणे हे सोपे काम नाही, याची आम्हाला जाणीव आहे. सुमारे १५ वर्षांपासून आमचे कुटूंब प्रकाश वार्ता या दैनिकाच्या रूपाने कार्यरत होतेच. आता नव्या आधुनिक युगात डिजिटल, प्रिंट आणि सोशल अशा तिन्ही माध्यमातून नव्या रुपात आणि नव्या पद्धतीने हिंदू प्रकाश वार्ताची सुरुवात करीत आहोत.

वृत्तपत्र हे समाज आणि देशाच्या जडणघडणीत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणारे माहितीचे व जनजागृतीचे एक प्रमुख साधन आहे . स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बातम्या, शैक्षणिक ज्ञान, मनोरंजन आणि जाहिरातींचा पुरवठा करून नागरिकांना अद्ययावत ठेवते, तसेच लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून शासनाच्या कामकाजावर लक्ष ठेवून सामाजिक परिवर्तन घडवून आणते. वृत्तपत्रे ही सर्व सामान्यांचे वैयक्तिक आयुष्य सुखकर करण्यासाठी महत्वाची भुमिका बजावतात. नवनवीन माहिती, नवीन शोध, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक घडामोडी, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शनपर माहिती ही वर्तमानपत्रातूनच मिळते. खरंतर वृत्तपत्रे ही समाज व मानव यांना जोडणारा सकारात्मक दुवा आहे. मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी ‘दर्पण’च्या माध्यमातून समाजात प्रबोधन आणि ज्ञानाचा प्रसार करण्याचे मोलाचे कार्य केले. सकारात्मक पत्रकारितेसाठी वैचारिक बांधिलकी हवी तरच असे पत्रकार विवेकी समाज मन घडवू शकतात. त्यामुळे विवेकी माणूस होणं हे सध्याच्या परिस्थितीत कठीण बाब असली तरी अवघड नाही . त्याकरीता सकारात्मक विचारांबरोबरच सामाजिक मूल्य जपून मार्गस्थ होण्याकडे आमचा प्रयत्न राहील. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्या प्रमाणे आपला उद्धार आपणच केला पाहिजे . कालची लढाई ही तलवारीची होती , आजची लढाई ही ब्रेन आणि पेनाची अर्थात बुद्धीची आहे . योग्य विद्येशिवाय आमचा उद्धार शक्य नाही. यापुढे ब्रेन आणि पेन चा वापर

पान - ७ वर ->

## नारी शक्ती वंदन अधिनियमाचा पराभव हा महिलांचा अपमान

**नवी दिल्ली |** नारी शक्ती वंदन अधिनियम ही १३१ वी घटनादुरुस्ती लोकसभेत शुक्रवारी झालेल्या मतदानात पराभूत झाली. घटनादुरुस्ती विधेयक मंजूर होण्यासाठी दोन-तृतीयांश मतांची आवश्यकता असते. पण विरोधकांनी विधेयकाला विरोध केल्यामुळे विधेयकाला दोन-तृतीयांश मते मिळाली नाही. काँग्रेस, समाजवादी पार्टी (SP), तृणमूल काँग्रेस (TMC), द्रमुक (DMK) यांच्या सह विरोधकांनी विधेयकाला विरोध केला. महिलांच्या स्वप्नाला विरोधकांनी चिरडले. पंतप्रधान म्हणून या घटनेसाठी मी देशाच्या नारी शक्तीची जाहीर माफी मागतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. देशाला उद्देशून केलेल्या विशेष भाषणात पंतप्रधान मोदींनी देशातील नारी शक्तीची माफी मागितली.

विरोधकांनी नारी शक्ती वंदन अधिनियम या घटनादुरुस्तीला विरोध करून महिलांचा अपमान केला. नारी शक्ती वंदन अधिनियम ही काळाची गरज आहे. हे विधेयक मंजूर झाले असते तर देशातील सर्व राज्यांच्या शक्तीत वाढ झाली असती. पण विरोधकांनी सरकारच्या प्रामाणिक प्रयत्नांची हत्या केली. ही एक भ्रूण हत्या आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

नारी शक्ती वंदन अधिनियम लागू झाले असते तर प्रत्येक राज्याचे संसदेतील प्रतिनिधित्व



वाढणार होते, महिलांचे संसदेतील प्रतिनिधित्वही वाढले असते. पण काही पक्षांनी स्वतःची घराणेशाही जपण्यासाठी विधेयकाला विरोध केला. काँग्रेस तर सुधारणाविरोधी पक्ष आहे. देशाच्या प्रगतीसाठी होणारे निर्णय हाणून पाडण्यासाठीच काँग्रेस प्रयत्न करत आहेत, असा गंभीर आरोप पंतप्रधान मोदींनी केला. समाजवादी पक्ष लोहियांचे विचार विसरला आहे. त्यांना स्वतःची प्रतिमा सुधारण्याची संधी होती.

## अखंड वीजपुरवठ्यासाठी राज्यात होणार ‘एआय’चा वापर

**मुंबई |** वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विजेची विक्रमी मागणी पूर्ण करतानाच, वीजनिर्मिती आणि पुरवठ्यात कोणताही व्यत्यय येऊ नये यासाठी आता 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा (एआय) आधार घेतला जाणार आहे. ऊर्जेचे नेटके व्यवस्थापन आणि तांत्रिक बिघाडांचा अंदाज घेण्यासाठी 'एआय'चा प्रभावी वापर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असून, यामुळे राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा नवा अध्याय सुरू होणार आहे.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे शनिवारी आयोजित उन्हाळ्यातील 'पीक डिमांड' आणि वीज वितरण व्यवस्थेच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. उन्हाळ्याचा वाढता तडाखा आणि आगामी पावसाळा या दोन्ही ऋतूंमध्ये वीजपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता असते. ही अडचण दूर करण्यासाठी केवळ पारंपरिक पद्धतींवर अवलंबून न राहता, ऊर्जा विभागाने तंत्रज्ञानाची जोड द्यावी, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली. विशेषतः मागणीचा अचूक अंदाज वर्तवणे, देखभाल-दुरुस्तीची कामे नियोजित करणे आणि संभाव्य तांत्रिक धोके ओळखण्यासाठी 'एआय' यंत्रणा महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या बैठकीला ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह टाटा पॉवर, अदानी पॉवर आणि 'बेस्ट'चे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यात सध्या रुफटॉप सौर ऊर्जेचा वापर वाढत असल्याने त्याचा मोठा फायदा वीज व्यवस्थापनात होत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.













# श्रमदानातून ऐतिहासिक बारवाची स्वच्छता व संवर्धन

## रोटरी क्लब व ब्राम्हण ऐक्य परिषदेचा उपक्रम



हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**अंबाजोगाई** | प्राचीन व पुरातन असलेल्या दासोपंत स्वामी समाधी परिसरात असलेल्या बारवाची स्वच्छता श्रमदानातून गुरुवारी सकाळी करण्यात आली. हा उपक्रम रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व ब्राह्मण ऐक्य परिषदेच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने राबविण्यात आला.

श्री भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्त अंबाजोगाई येथील दासोपंत महाराज समाधी परिसरातील ऐतिहासिक बारव (कुंड) येथे स्वच्छता व संवर्धन मोहीम उत्साहात व यशस्वीरित्या राबविण्यात आली.ही ऐतिहासिक बारव अंबाजोगाईच्या समृद्ध सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारशाचे प्रतीक असून, तिचे जतन व संवर्धन करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. या भावनेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला. या मोहिमेद्वारे स्वच्छतेसोबतच वारसा जतनाबाबत जनजागृती करण्याचाही संदेश देण्यात आला.

या उपक्रमात बारव परिसरातील कचरा, सुकलेली पाने, गवत व साचलेली घाण साफ करण्यात आली. तसेच परिसरातील नरसिंह मंदिर, महादेव मंदिर व मोकळा परिसर यांचीही स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमात ब्राह्मण ऐक्य परिषदेचे सदस्य शैलेश कुलकर्णी, शैलेश गोस्वामी तसेच त्यांचे सर्व सहकारी, राहुल देशपांडे, प्रकल्प प्रमुख अविनाश मुडेगावकर, रोटरी क्लबच्या अध्यक्षा रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंके, सहसचिव राधेश्याम लोहिया, प्रा. अजय पाठक , डॉ अनिल केंद्रे आणि समस्त

# ईगलवूड इंग्लिश स्कूलचा दहावी सी.बी.एस.ई निकाल दैदिप्यमान; ईगलवूडची जान्हवी वाघ जिल्ह्यात प्रथम 99.6%

हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**बीड** | फुले पिंपळगाव येथील ईगलवूड इंग्लिश स्कूलचा दहावी CBSE बोर्डाचा निकाल यंदा अत्यंत दैदिप्यमान ठरला असून, शाळेने गुणवत्तेचा नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. एकूण १०५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यापैकी सर्व विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक परंपरेला अधिक बळकटी दिली आहे.

निकालाच्या तपशीलावर नजर टाकल्यास, तब्बल २१ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले, तर २५ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा अधिक गुणांची कमाई केली. तसेच १९ विद्यार्थ्यांनी ७०% पेक्षा अधिक आणि २० विद्यार्थ्यांनी ६०% पेक्षा अधिक गुण मिळवत एकंदर निकालाची गुणवत्ता उंचावली आहे. या यशस्वी कामगिरीमुळे शाळेचा निकाल सर्वार्थाने 'उत्कृष्ट' ठरला आहे.



या निकालात विशेष उल्लेख करावा लागेल तो वाघ जान्हवी हिचा. तिने तब्बल ९९.६०% गुण मिळवत केवळ शाळेतच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या भव्य यशाने शाळेचे नाव जिल्हाभर उज्ज्वल केले आहे. त्याचप्रमाणे सोलंके तेजस्विनी हिने ९८.४०% गुण मिळवत शाळेत द्वितीय क्रमांक पटकावला, तर सावंत लखन याने ९७.२०% गुण मिळवत तृतीय स्थान मिळवले. या तिन्ही विद्यार्थ्यांच्या यशाने इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.या निकालामध्ये विषयनिहाय प्रथम, द्वितीय आणि तृतीय गुण खालीलप्रमाणे आहेत. इंग्रजी विषयात वाघ जान्हवी हिने १०० गुण,मराठी १०० गुण, संस्कृत १०० गुण, माहिती तंत्रज्ञान या विषयात वाघ जान्हवी,राघव पवार, आदित्य आतकरे, सोळंके तेजस्विनी आणि अर्णव भुतडा या पाच विद्यार्थ्यांनी १०० गुण मिळवले ,गणित विषयात वाघ जान्हवी व राघव पवार या दोघांनी ९५ गुण मिळवले ,विज्ञान विषयात वाघ जान्हवी व सोळंके तेजस्विनी या दोघींनी ९७ गुण मिळवले, सामाजिक शास्त्रात डाके महेश याने ९९ गुण, तर वाघ जान्हवी आणि सोळंके तेजस्विनी यांनी ९८ गुण मिळवले.

या दैदिप्यमान यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत तर आहेच पण त्याचबरोबर संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अर्चना पवार मॅडम, सचिव डॉ. शरद पवार सर, विश्वस्त डॉ. सुशील भैय्या लोढा सर आणि शाळेचे प्राचार्य सत्यजित सर यांचे दूरदृष्टीपूर्ण नियोजन आणि शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शनही तितकेच महत्त्वाचे ठरले आहे. शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना सक्षम शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देत अभ्यासक्रमाचे प्रभावी नियोजन केले. नियमित चाचण्या, वैयक्तिक मार्गदर्शन, तसेच विद्यार्थ्यांच्या शंका निरसनासाठी घेतलेल्या विशेष सत्रांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागला.

शिक्षकांनीही आपल्या कर्तव्यनिष्ठेचा उत्कृष्ट प्रत्यय देत प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिले. त्यांनी केवळ पाठ्यपुस्तकापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखून त्यांना योग्य दिशादर्शन केले, ज्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला आपली सर्वोत्तम कामगिरी करता आली. पालकांचा विश्वास, शिक्षकांचे अथक परिश्रम आणि विद्यार्थ्यांची जिद्द यांचा संगम या निकालातून स्पष्टपणे दिसून येतो. ईगलवूड इंग्लिश स्कूलने या निकालाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आपली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

शाळेच्या या अभूतपूर्व यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आगामी काळातही अशीच यशाची परंपरा कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# युगप्रवर्तक क्रिकेट चषक पोलीस संघाने पटकावला, दिमाखदार सोहळ्यात बक्षीस वितरण

## पो. नि.सुर्यतळ यांची फलंदाजीत दमदार कामगिरी

हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**माजलगाव (प्रतिनिधी** | "युगप्रवर्तक चषक २०२६" या प्रतिष्ठित क्रीडा स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला असून,यंदाच्या स्पर्धेत पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या नेतृत्वात पोलीस प्रशासनाच्या संघाने शानदार कामगिरी करत चषकावर आपले नाव कोरले.ही स्पर्धा यंदा बाराव्या वर्षात पदार्पण करत असून,कर्मचारी वर्गासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या या स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ यांच्या वतीने दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. कर्मचारी वर्गातील क्रीडागुणांना वाव देणे, शारीरिक तंदुरुस्ती वाढवणे आणि एकात्मता दृढ करणे हा या स्पर्धेमागील प्रमुख उद्देश आहे.विशेष म्हणजे,या स्पर्धेत केवळ कर्मचारीच सहभागी होत असल्याने तिची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.यंदाच्या स्पर्धेत शहर व परिसरातील विविध शासकीय व निमशासकीय विभागांतील एकूण सहा संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. संपूर्ण स्पर्धेदरम्यान पोलीस प्रशासनाच्या संघाने शिस्तबद्ध आणि आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीत इम्रान नाईक यांच्या नेतृत्वातील आय.के.एन.या बल्लाढ्य समजल्या जाणाऱ्या संघावर मात केली. आणि विजेतेपद पटकावले.बक्षीस वितरण समारंभात मान्यवरांच्या हस्ते विजेत्या पोलीस प्रशासनाच्या संघाला "युगप्रवर्तक चषक २०२६" प्रदान करण्यात आला. तसेच स्पर्धेतील सामनाविराचा मान ओंकार थेटे यांनी,बेस्ट बॅटसमन पोलीस निरीक्षण राहुल सूर्यतळ यांनी व बेस्ट बॉलर सचिन मंजुळे यांनी पटकावला.विजेते व उपविजेते संघातील खेळाडूंना ट्रॉफी,सन्मानचिन्ह आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अमोल राऊत,डॉ.श्रीराम खळगे,जीवन नखाते,अमोल गायकवाड,परमेश्वर पांचाळ,प्रभाकर साळवे,गोरख उघडे,ममताजी गायकवाड,नितीन पुटवाड,शेख सलीम व संपूर्ण सामन्याची पंचगिरी अबू शेरा व ढकलू यांनी करून विशेष सहकार्य केले. या स्पर्धा यशस्वीतेसाठी क्रीडा प्रमुख शेख मतीन व नितीन पुटवाड यांनी विशेष परिश्रम घेतले. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार होते. कार्यक्रमाचे संचालन नारायण भाळशंकर यांनी सर प्रस्ताविक भारतभाऊ टाकणखार यांनी केले.कार्यक्रमास बाळासाहेब सोनसळे सतीश डोने,प्रमोद साळवे,आनंद गायकवाड,प्रा.रोहित शेटे,डॉ.सुहास टाकणखार,पत्रकार विष्णू उगले,परमेश्वर सोळंके,बालासाहेब आडगळे तसेच सर्व सहभागी खेळाडू,पोलीस आदींची उपस्थिती होती. सर्व मान्यवरांनी खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करत,अशा उपक्रमांमुळे कर्मचारी वर्गात एकजूट,शिस्त आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते,असे मत व्यक्त केले."युगप्रवर्तक चषक" स्पर्धेमुळे शहरातील क्रीडा संस्कृतीला चालना मिळत असून,भविष्यातही अधिक मोठ्या प्रमाणावर स्पर्धा आयोजित करण्याचा संकल्प आयोजक वसंतभाऊ टाकणखार, शिवाजी भाळशंकर,अभिमन्यू इबिते,राजकुमार सोनवणे, किरण शिंदे,प्रवीण जाधव,राजेंद्र सातपुते,राहुल खुणे,निलेश गावडे,अमोल राऊत,अजमुद्दीन खतीब,सुमेध घाडगे,प्रतीक स्वामी यांनी व्यक्त केला.

**पो. नि.सुर्यतल यांचे स्पर्धेत ३१ षटकार** | युगप्रवर्तक क्रिकेट स्पर्धेत एकून ३१ षटकार ठोकून धुवांधार बॅटिंग करून उत्कृष्ट फलंदाजीची प्रदर्शन केले.

# शाश्वत कृषी उत्पादन प्रदर्शन व विक्री तसेच आंबा व धान्य महोत्सवाला बीडमध्ये उत्साहात सुरुवात



हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**बीड (प्रतिनिधी)** | बीड शहरात ग्राहकांना नैसर्गिक, सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने "शाश्वत कृषी उत्पादन प्रदर्शन व विक्री तसेच आंबा व धान्य महोत्सव २०२६" चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव दिनांक १७, १८ व १९ एप्रिल २०२६ रोजी अमृत मंगल कार्यालय, सुभाष रोड, बीड येथे होणार असून, महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत (FPO) शेतकरी स्वतः तयार केलेली उत्पादने येथे विक्रीसाठी उपलब्ध करून देणार आहेत. या प्रदर्शनात गावरान मध, मोरिंगा पावडर, गायीचे तूप, खवा-पेढे, विनापोलिश तांदूळ, नैसर्गिक गूळ, मसाले, ज्वारी चिवडा तसेच ताजे आंबे यांसारखी विविध उत्पादने ग्राहकांना पाहायला व खरेदीसाठी उपलब्ध राहतील. या उपक्रमामागील मुख्य उद्देश शेतकरी आणि ग्राहक यांच्यात थेट संवाद वाढवणे, स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देणे आणि नागरिकांना गुणवत्तापूर्ण पर्याय उपलब्ध करून देणे हा आहे.

या महोत्सवाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन शिता ॲग्रो शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड, शिरूर कासार यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# कवडगाव येथे वैराग्य महामेरु श्री संत गोरोबाकाका यांची पुण्यतिथी साजरी



**कवडगाव प्रतिनिधी** | वडवणी तालुक्यातील कवडगाव ,(बु) येथे श्री संत वैराग्यमूर्ती महामेरू व संत परीक्षक गोरोबाकाका यांची पुण्यतिथी मोठे उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाली या पुण्यतिथी उत्सवानिमित्त गावातील भजनी मंडळांनी सकाळी १०ते १२ या वेळेत संगीत भजन आयोजित करण्यात आले होते. या पुण्यतिथी उत्सवाला गावातील हभप चोले महाराज ह भ प बबन महाराज शिंदे,पखवाज वादक ह भ प महादेव महाराज पवळ ,कांता महाराज मुंडे, श्रीहरी महाराज मुंडे, बजरंग महाराज चव्हाण, दत्ता महाराज लेंडाळ, बाबु जोगदंड,आश्रुबा शेजाळ, बाबरे महादेव, बाबासाहेब रासवे, जगन काळे,शुभम उंडाळकर, अशोक उंडाळकर, डॉ.महादेव करडकर, वडवणी तालुका अध्यक्ष बळीराम करडकर यांच्यासह गावातील माता भगिनी भजनी मंडळ व बालगोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कवडगाव येथील कुंभार समाज बांधवांनी पुढाकार घेतला होता.

# जीवनातील अंधार संपवायचा असेल तर भीमज्योत तेवत ठेवा ; डॉ.राजेश इंगोले

## भीमाई नगर येथे भीमजयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**अंबाजोगाई** | सध्या देशात एकीकडे जातीयतेचा आणि धर्मांधतेचा विषारी विचार पसरवला जात असताना, दुसरीकडे मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वातंत्र्य, समता व न्यायाचे विचार हीच खरी भीमज्योत असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी केले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त साकूड रोड, भीमाई नगर येथे भीमजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी गायकवाड व वैदेही वाघमारे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रशांत पोटभरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जयंती समितीचे अध्यक्ष प्रफुल्ल जोगदंड, उपाध्यक्ष मंगेश दासूद, कोषाध्यक्ष सुमित साळवे, तुकेश कचरे,



प्रशांत पोटभरे इत्यादी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून डॉ.राजेश इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती, तर संरक्षण शास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.किरण चक्रे व्याख्याते म्हणून लाभले होते. यावेळी बोलताना डॉ.इंगोले म्हणाले की, आज समाजात द्वेषाचे, असमानतेचे वातावरण जाणीवपूर्वक निर्माण केले जात आहे. अशावेळी बाबासाहेबांची भीमज्योत म्हणजेच शिक्षण, समता आणि विज्ञानवादी दृष्टिकोन, अन्यायाविरोधात लढा तेवत ठेवणे हीच खरी भीमजयंती. जोपर्यंत ही भीमज्योत तेवत राहील, तोपर्यंत जातीयतेचा आणि धर्मांधतेचा अंधार मानवी मूल्यांना पराभूत करू शकणार नाही. त्यांनी तरूणांना बाबासाहेबांच्या शिका, संघटित व्हा, संघर्ष करा या मंत्रानुसार वाटचाल करत शासनकर्ती जमात बनण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. व्याख्याते प्रा.डॉ.किरण चक्रे यांनी डॉ.आंबेडकरांचे संरक्षण क्षेत्र आणि राष्ट्र उभारणीतील योगदान यावर प्रकाश टाकला. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आज भारताला महासत्ता बनविण्यासाठी कसे मोलाचे आहेत, हे त्यांनी सविस्तरपणे सांगितले. कार्यक्रमाला भीमाई नगर परिसरातील नागरिक, महिला व तरूण मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरूवातीस डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला डॉ.राजेश इंगोले, प्रा.डॉ.किरण चक्रे व जयंती समितीचे अध्यक्ष प्रफुल्ल जोगदंड, राहुल कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सामूहिक भीमवंदना घेण्यात आली.

# महिला सक्षमीकरणासाठी नारीशक्ती वंदन अधिनियम हा ऐतिहासिक कायदा ठरणार - रुपाली कचरे



हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**बीड** | देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली नुकतेच महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देऊन सशक्त भारताच्या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे .

याचाच एक भाग म्हणून भारतीय जनता पार्टी माजलगावच्या वतीने नारीशक्ती वंदन अभियानाला समर्थन देण्यासाठी दिनांक १६ एप्रिल २०२६ गुरुवार रोजी सायंकाळी मंगलनाथ मंदिर येथे विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्या महिलांनी या नारीशक्ती वंदन अधिनियम कायद्याला समर्थन देण्यासाठी उपस्थित राहिल्या व पंतप्रधान नरेंद्र मोदी , मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण नामदार पंकजा मुंडे मा. खा. प्रीतम मुंडे यांचे अभिनंदन करून धन्यवाद मानले .

प्रस्ताविक पर मनोगत व्यक्त करताना तालुकाध्यक्ष रूपाली कचरे म्हणाल्या देशाच्या उज्वल भविष्यासाठी महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून महिलांच्या राजकीय आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा ऐतिहासिक टप्पा ठरणार असून नेतृत्व विकासाला चालना मिळेल व निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढणार व समाज देखील अधिक समतोल व सक्षम होईल असे मत भाजपाच्या कीट्टी आडगाव मंडळाच्या तालुकाध्यक्षा रूपाली कचरे यांनी व्यक्त केले.

# कत्तलीसाठी नेले जाणारे गोवंश जप्त; आरोपी अटकेत

अंबाजोगाई : अंबाजोगाई शहरात बुरुज तलावासमोर गुरुवारी दुपारी पोलिसांनी मोठी कारवाई करत कत्तलीसाठी घेऊन जाणारा गोवंश जप्त केला आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून ही यशस्वी कारवाई केली. यामध्ये तीन जर्सी गायी आणि एका गोऱ्यासह सुमारे साडेतीन लाख रुपयांचा & मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरो ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस कॉन्स्टेबल युवराज राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास एका अशोक लेलँड टेम्पोमध्ये गोवंशीय जनावरे अत्यंत निर्दयीपणे कोंबून कत्तलीसाठी नेली जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीची शहानिशा करण्यासाठी पोलिसांनी पंचासह बुरुज तलाव परिसरात छापा टाकला असता, संशयित वाहन क्रमांक एमएच २५ एजे ६५८६ मिळून आले. या वाहनाची तपासणी केली असता त्यात तीन गायी आणि एक गोरा अत्यंत दाटीवाटीने आणि क्रूरपणे बांधलेले आढळले.

या कारवाईत पोलिसांनी आरोपी दशरथ शंकर जगदाळे, राहणार हिवरा, जिल्हा धाराशिव याला अटक केली आहे. जप्त केलेल्या जनावरांची किंमत ४३ हजार रुपये असून वाहनासह एकूण ३ लाख ४३ हजार रुपयांचा ऐवज पोलिसांनी हस्तगत केला आहे. आरोपीनू या मुक्या प्राण्यांना चारा पाणी न देता कत्तलीच्या उद्देशाने वाहतूक करून प्राण्यांचा छळ केल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अमोल गायकवाड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहे.

काल सायंकाळी आंबेजोगाई शहर पोलीस प्रशासनाच्या वतीने तीन गाई व एक नंदी यांना जीवदान देण्यात आले अनोळखी व्यक्ती हा त्याच्या पिकअप मध्ये गाईंना कतलीसाठी घेऊन आला असल्याची बातमी समजताच पोलिस घटनास्थळावर पोहचले व वाहनचालकास ताब्यात घेऊन चौकशी केली असता हा त्याच्या वाहनातअत्यंत क्रूरपणे गाईंना बांधून कत्तलीच्या उदेशाने त्याने 3 गाई व एक नंदी यांना कतली साठी घेऊन आला आहे .अशी खात्री झाल्यानंतर पोलिसांनी आरोपींस वाहना सकट पकडले व त्यावर गुन्हा नोंद करून 3 गाई व एक नंदी यांना ताब्यात घेऊन पुढील उपचारासाठी व संगोपनासाठी वरवटी येथील गोशाळेत वर्ग केले. असे ॲड अशोक मुंडे यांनी म्हटले आहे.



# धर्मरक्षक परशुराम आणि अक्षय तृतीया

हिंदू पौराणिक कथेनुसार आठ महापुरुष अमर मानले जातात जसे अश्वथामा ,राजा बली, महर्षी वेदव्यास ,हनुमानजी, बिभीषण, कृपाचार्य, परशुराम, ऋषी मार्कंडेय या सर्वांनी मृत्यूला जिंकले आणि अमर झाले. अशा आठ महापुरुषांपैकी परशुराम जे ऋषी महर्षी जमदग्नी आणि रेणुका माता यांचे पुत्र आणि भगवान विष्णू यांचे सहावे अवतार चिरंजीव (अमर) मानले गेले. यांची वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षातील तिसऱ्या दिवशी जयंती साजरी केली जाते. त्यांचे मूळ नाव राम होते परंतु हातात नेहमी परशु (कुऱ्हाड) धारण केल्यामुळे त्यांचे परशुराम असे नाव पडले .भगवान परशुराम हे केवळ योद्धा नव्हते तर ते महान गुरु देखील होते. अनेक योद्धांना त्यांनी शिक्षण दिले. शस्त्रविद्या ,शौर्य ,नैतिकता, अन्यायाविरुद्ध लढा, आज्ञाधारकता, गुरुभक्ती, त्याग भावना, धर्मसंरक्षण ,संघर्षाला सामोरे जाण्याची प्रेरणा आपल्याला भगवान परशुराम यांच्याकडून मिळते .

हिंदू धर्मातील अत्यंत शुभ साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त असलेला सन म्हणजे अक्षय तृतीया . या दिनी श्री गणेश, लक्ष्मी आणि विष्णूचे नामस्मरण आणि पूजा, हवन केले जाते. पूजा केल्याने सुख, शांती, समृद्धी प्राप्त होते.गुळ आणि दुधापासून बनवलेले गोड पदार्थ ,आमरस, पुरणपोळी यांचा नैवेद्य दाखवून दानधर्म, उपवास ,सत्कर्म, सत्वचन ,अत्यंत पवित्र मानले जाते .या दिवशी केलेले कार्य कधीही नष्ट न पावणारे म्हणजेच अक्षय असे मानले जाते. देव आणि पितर यांना उद्देशून जे कर्म केले जाते ते अविनाशी होते.

भारतीय संस्कृतीमध्ये पोषण आणि समृद्धीची प्रतिक असलेले तांदूळ याला अत्यंत पवित्र मानले आहे . प्रत्येक कार्यामध्ये व आहारामध्ये याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून तांदळाचा योग्य वापर आरोग्यास हितकारक आहे. तांदळामध्ये वेगवेगळे प्रकारचे पौष्टिक तत्वे असल्याकारणामुळे बालकापासून वयोवृद्ध पर्यंत पचनास हलके आहे . तसेच तांदूळ हा कार्बोहायड्रेट चा मुख्य स्त्रोत असून शरीराला ऊर्जा देते प्रथिने, जीवनसत्वे आणि खनिजे (लोह, पोटॅशियम) फायबर युक्त आणि ऊर्जा वाढविण्यास मदत करणारे, शरीराच्या वाढीसाठी उपयुक्त .या शुभ दिनी तांदूळ सैंधव मीठ धने यांची खरेदी केली असता समृद्धी टिकून राहते. तसेच इतर मौल्यवान वस्तू (चांदी ,सोने) वाहने ,घर , मालमत्ता ,कपडे गरजूंना दानधर्म ,नवीन प्रकल्प, गुंतवणूक इत्यादी अक्षय अनंत शाश्वत राहते. स्वच्छ जागेवरती पाटावर लाल किंवा पिवळा कपडा पसरून त्यावरती तांदूळ ठेवून मातीचा किंवा तांब्याचा कलश( अक्षय पात्र) ठेवून त्यामध्ये तांदूळ सोने ,पैसे ,धने विष्णू लक्ष्मी याची पूजा केली असता घरातील ऐश्वर्य टिकून राहते . जीवनात प्रगती करत असताना आपल्या दिवंगत पूर्वजांचा आदर आणि स्मरण करण्याचा हा दिवस.

परशुराम जयंती आणि अक्षय तृतीया साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त असल्याने कोणतेही शुभ कार्य करताना या दिनी मुहूर्त पाहण्याची गरज लागत नाही.पौराणिक कथेनुसार त्रेता युगाची सुरुवात देखील अक्षय तृतीयेच्या दिवशी झालेली होती. त्याचबरोबर भागीरथीच्या कठोर तपश्चर्येने प्रसन्न होऊन गंगादेवी स्वर्गातून पृथ्वीवर अवतरली होती. महर्षी व्यास यांनी महाभारताचे लेखन सुद्धा आजच्या दिनी सुरू केले होते. श्रीकृष्णाने पांडवांना वनवासात अक्षय पात्र दिले जे कधीच रिकामे होत नव्हते ज्यातून पांडवांना अन्न मिळत होते तेही अक्षय तृतीयेच्या दिनी. तसेच देवी पार्वतीचा अवतार असलेल्या अन्नपूर्णा देवीनी याच दिवशी भगवान शंकराला अन्न स्वरूप भिक्षा घातली होती त्यामुळे अन्नधान्य आणि स्वयंपाक घराची पूजा करावी, भुकेलेल्याना अन्न द्यावे, तहानलेल्यांना पाणी द्यावे, दानधर्म करत राहावे, प्राणीमात्रांवर दया करावी हा संदेश देखील यातून आपणास मिळतो . अशाप्रकारे मन प्रफुल्लित करून संपत्ती, समाधान आणि आनंद आपणही आपल्या आयुष्यात अक्षय टिकूयात.

सौ .अश्विनी वासुदेवराव टेकाळे (जोशी)
सहशिक्षिका .बीड

# केज येथे पाऊणतास रस्ता रोको : प्रशासनाच्या लेखी आश्वासानंतर आंदोलन मागे

केज : केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघातीय मृत्यूनंतर निर्माण झालेल्या शंकामय बाबीचीं सखोल चौकशी करा, कानडी रोड नादुरुस्त रस्ता चोवीस तासात दुरुस्त करा व लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्यगृह 15 ऑगस्ट पूर्वी केज नगरपंच्यायत कडे हस्तान्तरीत करा या तीन प्रमुख मागण्यासाठी केज विकास संघर्ष समितीने शुक्रवारी केज तहसील कार्यालयासमोरील महामार्गांवर पाऊणतास केलेले रस्ता रोको आंदोलन अखेर प्रशासनाच्या लेखी आश्वासानंतर मागे घेण्यात आले.

वरील तिन्ही मागण्यासंदर्भात प्रशासनाने दखल घेवून लेखी आश्वासन दिले. या अंतर्गत मयत तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघात व मृत्यूचीविशेष चौकशी स्थानिक गुन्हा शाखेकडे सोपवल्याचे सांगण्यात आले व घटनेचे संपूर्ण सत्य शोधून काढले जाईल असे सांगण्यात आले.

अपूर्ण असलेल्या कानडी रस्त्याचे दोन्ही बाजूचे पंखे भरुन येत्या 20 एप्रिल पूर्वी रस्ता काम पूर्ण करण्यात येईल तसेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्यगृहाचे काम 15 ऑगष्ट पूर्वी पूर्ण करून ते केज नगरपंचायत कडे सोपवले जाईल असे लेखी आश्वासन संबंधित यंत्रनेने दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, इंजि मोहनराव कराड, संपत वाघमारे, गौतम बचूटे यांच्यासह अनेक नागरिक सहभागी झाले होते.




# अण्णासाहेब पाटील महामंडळाची कर्ज व्याज परतावा योजना अधिक सुलभ; ऑनलाईन सुविधांमुळे लाभार्थ्यांना मोठा दिलासा

**मुंबई ( प्रतिनिधी ):** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा योजनेची कार्यपद्धती अधिक सुलभ, पारदर्शक आणि लाभार्थी-केंद्रित करण्यात आली आहे. सुधारित प्रणालीमुळे लाभार्थ्यांना आता अनेक प्रक्रिया स्वत:च्या लॉगिनद्वारे ऑनलाईन पूर्ण करता येणार असल्याने मोठा दिलासा मिळणार आहे. तरी लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा,असे आवाहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी केले आहे.

योजनेतंर्गत बँक मंजुरी स्तरावर कागदपत्राच्या अपूर्णतेमुळे 'रिजेक्ट फॉर इनक्मप्लिट डॉक्यूमेंट्स' या कारणाने प्रलंबित राहिलेली प्रकरणे आता लाभार्थ्यांना त्यांच्या लॉगिनवर पाहता येणार आहेत. या प्रकरणांमधील अपूर्ण कागदपत्रे लाभार्थी स्वत: ऑनलाईन अपलोड करून पूर्तता करू शकणार आहेत. आवश्यक कागदपत्रे अद्ययावत केल्यानंतर संबंधित प्रकरण 'स्क्रुटिनी' स्तरावर जाईल. या स्तरावर महामंडळाकडून कागदपत्रांची ऑनलाईन पडताळणी झाल्यानंतर पात्र प्रकरणांसाठी 'सबमिट' पर्याय उपलब्ध होईल. लाभार्थ्यांनी 'सबमिट' केल्यानंतर प्रकरण पुढील तपासणीसाठी मुख्यालयाकडे पाठविले जाईल.

व्याज परतावा क्लेम प्रक्रियेतही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. कागदपत्रांतील त्रुटींमुळे 'होल्ड' स्थितीत असलेली प्रकरणे आता लाभार्थ्यांना त्यांच्या लॉगिनवर कारणांसह दिसणार आहेत. अशा प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता संबंधित जिल्हा समन्वयकांमार्फत करावी लागेल. प्राथमिक तपासणी जिल्हा स्तरावर होऊन त्यानंतर विभागीय समन्वयकांमार्फत प्रकरणे मुख्यालयाकडे पाठविली जातील. लाभार्थ्यांनी १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रे सादर करून प्रकरण नियमित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भविष्यात 'होल्ड' प्रकरणांसाठी आवश्यक कागदपत्रे थेट लॉगिनद्वारे अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

तसेच, त्रुटी नसलेल्या क्लेम प्रकरणांसाठी पूर्वी व्याज परतावा खात्यात जमा झाल्यानंतरच पुढील क्लेम सादर करता येत होता. मात्र, सुधारित प्रणालीमध्ये प्रकरण 'सेंट फॉर सीएएफओ' स्तरावर पोहोचताच पुढील क्लेम सादर करण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांचा वेळ वाचणार असून प्रक्रिया अधिक गतिमान होणार आहे.

दरम्यान, काही प्रकरणांमध्ये समान मोबाईल क्रमांक, बँक तपशीलातील विसंगती किंवा कागदपत्रांतील खाडाखोड आढळल्यामुळे ती 'ब्लॉक' करण्यात आली आहेत. नाशिक व अहिल्यानगर येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे एजंटमार्फत झालेल्या गैरव्यवहारानंतर खबरदारीचा उपाय म्हणून ही कारवाई करण्यात आली आहे. या संदर्भात सध्या फौजदारी कार्यवाही सुरू आहे. अशा प्रकरणांतील लाभार्थ्यांनी आवश्यक दुरुस्ती करून तसेच मूळ कागदपत्रांसह संबंधित अर्ज जिल्हा समन्वयकांकडे सादर करावा. पडताळणीनंतर महामंडळाकडून योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे.

महामंडळाकडून सर्व लाभार्थ्यांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी आपल्या लॉगिनवर जाऊन प्रकरण 'होल्ड' किंवा 'ब्लॉक' होण्याची कारणे तपासावीत व त्वरित कागदपत्रांची पूर्तता करावी. कोणतीही अडचण असल्यास जिल्हा समन्वयकांशी संपर्क साधून मार्गदर्शन घ्यावे. सर्व संपर्क तपशील महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच, लाभार्थ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत वेब प्रणालीद्वारेच अर्ज व प्रक्रिया पूर्ण करावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून 'मासूम' प्रकल्पाचा राज्यव्यापी विस्तार

**मुंबई ( प्रतिनिधी ):** बालसंगोपन संस्थांमध्ये राहणाऱ्या मुलांना भावनिक आणि सामाजिक आधार देण्यासाठी 'मासूम' प्रकल्प राबविण्यात येतो. येथील अनेक मुलांना त्याग, आघात, शोषण किंवा प्रतिकूल परिस्थितीमुळे मानसिक त्रासाचा सामना करावा लागतो. अशा मुलांच्या भावनिक व मानसिक गरजा ओळखून त्यांना योग्य वेळी सहाय्य मिळावे, या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने 'मासूम' प्रकल्पाचा राज्यव्यापी विस्तार करण्यात आला आहे.



महिला व बाल विकास विभाग आणि आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या 'ईमपॉवर' उपक्रम यांच्यातील परस्पर सामंजस्य करारातून या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत प्रकल्पांतर्गत २० संस्थांमधील १,८६१ मुलांना लाभ मिळाला असून ५,००० हून अधिक समुपदेशन सत्रे घेण्यात आली आहेत. मानकीकृत मूल्यांकन साधनांच्या आधारे मुलांच्या भावनिक स्थैर्यात आणि सामाजिक वर्तनात लक्षणीय सुधारणा झाल्याचे दिसून आले आहे. तसेच पालक व पालक प्रतिनिधींनाही समुपदेशन देऊन कुटुंबीय नातेसंबंध मजबूत करण्यावर भर देण्यात आला आहे.

फेब्रुवारी २०२३ मध्ये सामंजस्य कराराद्वारे या प्रकल्पाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. बालसंगोपन संस्थांमध्ये राहणाऱ्या अनेक मुलांना त्याग, आघात, शोषण किंवा प्रतिकूल परिस्थितीमुळे मानसिक त्रासाचा सामना करावा लागतो. अशा मुलांच्या भावनिक व मानसिक गरजा ओळखून त्यांना योग्य वेळी सहाय्य मिळावे, हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

प्रारंभी महाराष्ट्रातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर या जिल्ह्यांमध्ये मर्यादित स्वरूपात राबविण्यात आलेला हा प्रकल्प आता राज्य शासनाने निश्चित केलेल्या १२१ बालसंगोपन संस्थांपर्यंत विस्तारण्यात येत आहे. या संस्थांमध्ये दोन प्रमुख गटांतील मुले राहतात, एक म्हणजे संकटग्रस्त मुले, जसे अनाथ, मानव तस्करीतून मुक्त केलेली मुले किंवा कुटुंबाकडून काळजी घेणे शक्य नसलेली मुले; आणि दुसरा गट म्हणजे कायद्याच्या संघर्षात आलेली मुले, जी न्यायप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निरीक्षण गृहात ठेवली जातात.

'मासूम' प्रकल्पांतर्गत मुलांना ट्रॉमा-आधारित समुपदेशन आणि सातत्यपूर्ण मानसिक आधार दिला जातो. यामध्ये मानसशास्त्रीय चाचण्यांद्वारे मुलांची तपासणी करून आवश्यकतेनुसार प्रशिक्षित मानसोपचारतज्ज्ञांकडून समुपदेशन व थेरपी दिली जाते. काही प्रकरणांमध्ये सखोल निदान करून दीर्घकालीन उपचारांची आवश्यकता देखील ठरवली जाते.

या मुलांसाठी पारंपरिक समुपदेशन पद्धती नेहमी प्रभावी ठरत नसल्यामुळे 'मासूम' प्रकल्पात आर्ट-आधारित थेरपीचा वापर करण्यात येतो. या माध्यमातून मुले आपल्या भावना सहजपणे व्यक्त करू शकतात आणि त्यांच्या वर्तनात सकारात्मक बदल दिसून येतात. पुढील टप्प्यात काही संस्थांमध्ये ऑक्युपेशनल थेरपी सुविधा उपलब्ध करून देण्याचीही योजना आहे.

प्रकल्पाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे क्षमता विकास. बालकल्याण समिती सदस्य, जिल्हा बाल संरक्षण युनिट अधिकारी तसेच बालसंगोपन संस्थांतील कर्मचारी यांना मानसिक आरोग्य, संवाद कौशल्ये आणि समस्या ओळखण्याबाबत प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे मुलांसाठी अधिक सुरक्षित, संवेदनशील आणि समर्थ वातावरण निर्माण होण्यास मदत होते.

नवीन करारानुसार 'मासूम' प्रकल्पाचा विस्तार करताना अधीक्षक, बालकल्याण समिती आणि किशोर न्याय मंडळ यांच्याशी समन्वय साधून प्रत्येक मुलाला त्याच्या गरजेनुसार योग्य सेवा मिळेल याची काळजी घेतली जाणार आहे. प्रकल्पाच्या प्रगतीविषयी मासिक व तिमाही अहवाल महिला व बाल विकास विभागास सादर करण्यात येणार आहेत.

'मासूम' प्रकल्प हा सार्वजनिक-खासगी भागीदारीचा एक प्रभावी नमुना ठरत असून, केवळ मानसिक आघातावर मात करण्यापुरता मर्यादित न राहता मुलांमध्ये आत्मविश्वास, भावनिक सक्षमता आणि उज्ज्वल भविष्याची दृष्टी निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहे.

# नगरविकास विभागाने महिला सुरक्षेसाठी स्वतंत्र कार्यप्रणाली विकसित करावी - उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**मुंबई ( प्रतिनिधी ):** राज्य शासनाच्या महिला धोरणांतर्गत महानगरपालिका क्षेत्रात महिला सुरक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नगरविकास विभागाला मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांच्या आधारे समानतेचा विचार पुढे नेत महिलांच्या विशेष गरजा ओळखून स्वतंत्र व परिणामकारक कार्यप्रणाली विकसित करावी, असे निर्देश विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.



१६ एप्रिल २०२६ रोजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन महिला सुरक्षेसंदर्भात पुढील मार्गदर्शन व सहकार्याबाबत निवेदन सादर केले होते. महिला सक्षमीकरण व सुरक्षेबाबत नगरविकास विभागाकडून करावयाच्या उपाययोजना व कार्यवाहीच्या संदर्भात त्यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात बैठक पार झाली. बैठकीस नगरविकास विभागाचे उपसचिव अजिंक्य बगाडे तसेच अक्षरा सेंटर, मुंबईच्या सहसंचालक नंदिनी शाह यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी सुविधा उपलब्ध करण्यावर विशेष भर देणे आवश्यक आहे. उद्याने, क्रीडांगणे, मॉल्स व बाजारपेठांमध्ये महिलांच्या गरजा लक्षात घेऊन सुविधा विकसित कराव्यात. तसेच स्वच्छ व मानक कार्यपद्धती असलेली पाळणाघरे व शिशुगृहे उपलब्ध करून देण्यात यावीत. सार्वजनिक उद्यानांमध्ये ठराविक वेळ महिलांसाठी व त्यांच्या सोबत येणाऱ्या लहान मुलांसाठी राखीव ठेवण्याबाबतही विचार करावा.

तसेच राज्यातील सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये निर्जन व अंधाऱ्या ठिकाणी पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी. बाजारपेठा, घाट व बसथांबे परिसरात स्वच्छतागृहांची सोय करण्यात यावी. महिलांच्या सुरक्षेसंदर्भातील योजनांच्या अंमलबजावणीत कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची दक्षता घेण्याचेही त्यांनी निर्देश दिले.महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती प्रभावीपणे पोहोचण्यासाठी प्रत्येक वॉर्डमध्ये महिला मदत केंद्र स्थापन करावीत, अशी सूचनाही त्यांनी केली. महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी जेंडर रिसोर्स सेंटर उभारणे, तक्रार निवारण प्रणाली अधिक सक्षम करणे, तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.याशिवाय, राज्यातील सर्व महापालिकांच्या परिवहन सेवांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात याव्यात. बसस्थानकांवरील सुविधा, सुरक्षितता, अलार्म व्यवस्था तसेच मोठ्या बस डेपोमधील अडचणींकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. यासाठी नगरविकास विभागाने सर्व महापालिकांच्या परिवहन विभागांसोबत समन्वय साधून बैठक आयोजित करावी, असेही त्यांनी सांगितले.

# कंत्राटी कामगारांच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करा – ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे

**मुंबई ( प्रतिनिधी ):** महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषण या वीज कंपन्यांमधील कंत्राटी कामगारांच्या समस्यांचा आढावा ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी घेऊन कंत्राटी कामगारांच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या सभागृहात बैठक झाली. या बैठकीस महानिर्मिती, महापारेषण व महावितरणचे संबंधित अधिकारी आणि भारतीय मजदूर संघ प्रणित कंत्राटी कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत कंत्राटी कामगारांचे वेतन, सेवा अटी, सुरक्षितता, विमा संरक्षण या विषयी चर्चा करण्यात आली. कामगारांच्या अडचणी तातडीने सोडवण्यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. कंत्राटी कामगारांच्या समस्या संवेदनशीलतेने हाताळण्याबाबत सूचना देत राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी कंत्राटी कामगारांच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी दर तीन महिन्यांनी नियमित बैठक घेण्याचे निर्देशही दिले.

# राज्यात ९ नवीन कारागृहे प्रस्तावित; बंदी क्षमतेत वाढ

**मुंबई ( प्रतिनिधी ):** राज्यात पालघर, अहिल्यानगर, बारामती, येरवडा क्र.०२ व क्र. ०३ जि. पुणे, गोंदिया, हिंगोली, भुसावळ (जि. जळगाव) व अंबाजोगाई (जि. बीड) अशा एकूण नऊ ठिकाणी नवीन मध्यवर्ती व जिल्हा कारागृहे बांधणे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुसार एकूण १२ हजार २५८ ने बंदी क्षमतेत वाढ होणार आहे. त्यापैकी पालघर, नारायणडोह (अहिल्यानगर) व बारामती (पुणे) येथे अनुक्रमे १८, ३५ व ६० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित बांधकामे प्रगतीपथावर आहेत.येरवडा मध्यवर्ती, येरवडा खुले, येरवडा महिला खुले कारागृह, नागपूर मध्यवर्ती कारागृह, बुलढाणा जिल्हा कारागृह, यवतमाळ व वर्धा जिल्हा कारागृह येथे सर्व मिळून ३५ बॅरेकची बांधकामे प्रगतीपथावर असून ती पूर्ण होताच एकूण अधिकृत बंदी क्षमतेत १,०३५ एवढी वाढ होणार आहे.तसेच २०२५-२६ या आर्थिक वर्षात संभाजीनगर मध्यवर्ती व संभाजीनगर खुले कारागृह, अकोला महिला खुले कारागृह, कोल्हापूर खुले कारागृह, विसापूर (जि. अहिल्यानगर) खुले कारागृह, लातूर जिल्हा कारागृह, जालना जिल्हा कारागृह व धुळे खुले कारागृह या अस्तित्वातील कारागृहांत अतिरिक्त बॅरेक्सच्या बांधकामास प्रशसकीय मान्यता देण्यात आली आहे. सदरची बांधकामे पूर्ण होताच एकूण ११३८ एवढ्या बंदी क्षमतेत वाढ होणार आहे.नवीन कारागृह बांधकामांची एकूण बंदी क्षमता १२,२५८ व अतिरिक्त बॅरेक्सची बांधकामे ४,०२९ असे एकूण १६,२८७ नव्याने बंदी क्षमतेत वाढ होणार आहे. राज्यातील कारागृहातील बंद्याची वाढती संख्या लक्षात घेता एकूण १४ ठिकाणी नवीन जागेची मागणी करण्यात आली आहे. नवीन जागा कारागृह विभागास प्राप्त होताच, त्या ठिकाणी नवीन मध्यवर्ती/जिल्हा कारागृहे प्रस्तावित करता येतील. त्यामुळे देखील राज्यातील कारागृहांची अधिकृत बंदी क्षमतेत वाढ होणार आहे.मुंबई मध्यवर्ती कारागृहाचा पुर्नविकास करण्याच्या दृष्टीने त्याचे नकाशे व आराखडे तयार करण्याची कार्यवाही पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. मुंबई यांच्याकडून प्रगतीत आहे. मुंबई मध्यवर्ती कारागृहातील सर्कल क्र. १२ सी हा संपूर्ण व सर्कल क्र. १२बी या इमारतीचा तळमजला हे सद्यस्थितीत विधि विभागाच्या ताब्यात आहेत. ते दोन्ही भाग कारागृह विभागास हस्तांतर करण्याची कार्यवाही चालू आहे.तरी राज्यातील कारागृहात बंद्यांची अतिगर्दी कमी करण्याच्या अनुषंगाने नविन कारागृहांचे बांधकाम, अस्तित्वातील कारागृहांत अतिरिक्त बॅरेक्सचे बांधकाम तसेन नवीन कारागृहांच्या बांधकामासाठी नवीन जागेची मागणी अशा उपाययोजना करण्यात येत आहेत, अशी माहिती गृह विभागाने दिली आहे.

## शिक्षक पात्रता परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी २४ एप्रिल पर्यंत मुदतवाढ

**मुंबई ( प्रतिनिधी ):** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद कार्यालयामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीइटी) २०२६ परीक्षेचे रविवार २१ जून २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी २४ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे परिषदेचे आयुक्त महेश चोथे यांनी कळविले आहे.या परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी २७ मार्च ते १६ एप्रिल २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि परीक्षार्थी/ उमेदवारांमार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची मुदत वाढविण्याबाबतची विनंती लक्षात घेता ही मुदतवाढ देण्यात येत असल्याचे परीक्षा परिषदेमार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

# 'रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठा'च्या ५० ठिकाणी शाखा होणार : कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा



रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचा तिसरा वर्धापन दिन

**मुंबई ( प्रतिनिधी ):** सिंगापूरच्या कौशल्य विद्यापीठाच्या धर्तीवर राज्यात रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने आगामी वर्षापर्यंत ५० ठिकाणी शाखा सुरू कराव्यात. तसेच या विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १०० टक्के नोकरीची हमी मिळेल अशा स्वरूपाची विद्यार्थ्यांची तयारी सिंगापूरच्या कौशल्य विद्यापीठाच्या धर्तीवर तयार करून घ्यावी, असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

एल्फिस्टन तांत्रिक विद्यालयाच्या मध्यवर्ती रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या तिसऱ्या वर्धापन दिन सोहळ्याप्रसंगी मंत्री लोढा बोलत होते. या कार्यक्रमाला रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल, राज्य नाविन्यता सोसायटीचे आयुक्त डॉ. अमित सैनी, राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.श्रीकांत पाटील, व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सुर्यवंशी, आयुषचे नॅशनल रिसर्च प्रोफेसर प्रा. डॉ. भूषण पटवर्धन यावेळी उपस्थित होते.मंत्री लोढा म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली आपण नवीन शैक्षणिक धोरणातून 'कौशल्यावर आधारित' शिक्षण देत आहोत. राज्यात मुख्यमंत्री महाफंड योजनेअंतर्गत तीन टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. या योजनेतून राज्यात २ लाख उद्योजक घडविणार आहोत आणि ५० हजार स्टार्टअप्सपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट आहे., निवडक स्टार्टअप्सना सरकारकडून आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. राज्यातील ४१७ आयटीआयमध्ये मुख्यमंत्री महाफंड योजनेतून उद्योजक घडविण्यासाठी आयटीआयजवळ जागा उपलब्ध करून दिली जाईल. प्रत्येक हाताला काम आणि प्रत्येक कामाला सन्मान यामुळे मिळेल.आपण एक कुटुंब आहोत, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शासन पूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी उभे आहे असेही ते म्हणाले.मंत्री लोढा म्हणाले की, सिंगापूरच्या प्रगतीचे रहस्य त्यांच्या 'एज्युकेशनल रिफॉर्म्स' आणि 'स्किल डेव्हलपमेंट'मध्ये दडलेले आहे. तिथल्या अर्थव्यवस्थेचा कणा शिक्षण आणि तंत्रज्ञान आहे. सिंगापूरमध्ये जिथे केवळ २५ लाख रुपयांच्या गुंतवणुकीतून संपूर्ण अर्थव्यवस्थेला गती देणारे प्रकल्प उभे राहतात. तिथे १०० टक्के रोजगाराची हमी दिली जाते. आपल्यालाही महाराष्ट्रात हेच 'सिंगापूर मॉडेल' कौशल्य विकासाच्या माध्यमातून आणायचे आहे.यावेळी आयडिशेन कॉम्पिटिशन सहित विविध स्पर्धातील विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. राजेश तलवारे यांचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल यावेळी सत्कार करण्यात आला. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या योगदानाची दखल घेत, 'सर्वोत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

## श्रीक्षेत्र माहूरगड येथे विकासकामांना गती; भाविकांसाठी दर्जेदार सुविधांवर भर- पालकमंत्री अतुल सावे

**नांदेड ( प्रतिनिधी ):** श्रीक्षेत्र माहूरगड येथे सुरू असलेल्या विकासकामांमधून भाविकांना अधिकाधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत, यासाठी सर्व विभागांनी समन्वयातून नियोजनबद्ध कामे पूर्ण करावीत, असे निर्देश राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले. माहूर येथे श्रीक्षेत्र माहूरगड विकास आराखड्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी आ. भिमराव केराम, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपवनसंरक्षक मनीषा पाटील, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी जेनीतचंद्र दोन्तुला, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. माहूर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे भाविकांना सोयीस्कर, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विकासकामांना गती देण्याच्या सूचना पालकमंत्री अतुल सावे यांनी दिल्या. तसेच या पवित्र स्थळाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासन कटिबद्ध असून अडचणी तात्काळ सोडविल्या जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.यावेळी पालकमंत्री श्री.सावे यांनी श्री रेणुका देवी मंदिर परिसर, मातृतीर्थ कुंड, पर्यटक सुविधा केंद्र, वाहनतळ तसेच इतर पायाभूत सुविधांच्या पहिल्या टप्प्यातील कामांचा सविस्तर आढावा घेतला. यासोबतच श्री दत्त मंदिर व शिखर परिसर, श्री अनुसया देवी मंदिर, कैलास टेकडी, श्री महादेव मंदिर, वनदेव मंदिर, कपिलेश्वर मंदिर, विविध दर्गे, बौद्ध विहार, जमदग्नी कृषी मंदिर, गणपती मंदिर परिसर तसेच पोचमार्ग विकास, वन विभाग व पुरातत्व विभागाच्या कामांचा आढावा घेण्यात आला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक **श्री. रोहित विकास पाटील** यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर-431001 येथून प्रकाशित केले. **संपादक : रोहित विकास पाटील** **email :** hinduprakashvarta@gmail.com **website :** www.hinduprakashwarta.com **PRGI No.:** MHMAR/25/A2358 **संपर्क क्र. : 7261999911**

## सोयगाव तालुक्यात यंदा रब्बी हंगामा मध्ये शेतकऱ्यांनी ज्वारी पेरनीला पसंती



हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१७ एप्रिल |** सोयगाव तालुक्यात यंदा रब्बी हंगामा मध्ये शेतकऱ्यांनी ज्वारी पेरनीला पसंती दिली आसमानी संकटाशी संघर्ष करीत रब्बी पीक उभे केले.ऊत्पादन खर्च नुसार ज्वारी पिकास भाव मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला. तालुक्यातील रब्बी ज्वारी पेरणी क्षेत्र मोठ्या प्रमाणात असून ज्वारीला बाजार भाव कमी असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांची मागणी विचारात घेऊन जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांनी डि.एम.ओ.राठोड यांच्याशी फोनवर चर्चा करून हमीभाव ज्वारी खरेदी केंद्र तात्काळ सुरू करण्याची मागणी केली तसेच तहसील प्रशासनाला खरेदी विक्री संघ संचालक मयूर मनगटे,संचालक तथा भाजपा शहराध्यक्ष मंगेश सोहनी व कृषिभूषण अरुण सोहनी यांनी नायब तहसीलदार देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली.शासनाने ज्वारीला चांगला हमीभाव जाहीर केला असल्याने शेतकऱ्यांनी हमीभावाने ज्वारी खरेदी केंद्र सुरू करण्याच्या मागणीला जोर धरला होता शेतकऱ्यांची ही मागणी विचारात घेऊन खरेदी विक्री संघ संचालक व कृषी भूषण यांच्या वतीने प्रशासनाला निवेदन देऊन तालुक्यात हमीभावाने ज्वारी खरेदी केंद्र सुरू करावे अशी मागणी करण्यात आली.

# लासूर स्टेशन येथे महावितरणच्या जीर्ण ताऱ्यांमुळे आग; शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

लासूर स्टेशन (ता. गंगापूर) : येथील अनंतपूर शिवारातील गट नंबर 23 मधून जाणाऱ्या महावितरणच्या 33 केव्ही उच्चदाब वीजवाहिनीवरील जीर्ण तारा व कट पॉईंट पोलवरील डिस्कमध्ये झालेल्या स्पार्किंगमुळे शनिवार दिनांक 18 रोजी दुपारी सराफ लॉन्स परिसरात पुन्हा आग लागून शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे.



या आगीत सुमारे दोन एकर पिकासह झाडे, ठिबक सिंचन व्यवस्था आणि पाईपलाईन,सागवान दारे, चौकटी, खिडक्या जळून खाक झाली.

स्थानिक शेतकऱ्यांच्या माहितीनुसार, संबंधित वीजवाहिनी व पोल अत्यंत जीर्ण अवस्थेत असून त्यावर वारंवार स्पार्किंग होत असते. विशेष म्हणजे, याच ठिकाणी यावर्षात पाचवी-सहावी वेळ अशी आग लागण्याची घटना घडली आहे. यापूर्वी चार वेळा पंचनामा होऊनही संबंधित शेतकऱ्याला अद्याप कोणतीही नुकसान भरपाई मिळालेली नाही, अशी नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

सदर बाबत शेतकऱ्याने महावितरणच्या स्थानिक तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार लेखी व ऑनलाइन तक्रारी केल्या असूनही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला जात आहे. वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे शेतकरी हवालदिल झाला असून जीवितहानीचीही भीती व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर, संबंधित शेतकऱ्यांनी तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी तसेच अनंतपूर शिवारातील गट नंबर 23 मधून जाणारा 33 केव्ही वीजवाहिनीचा धोकादायक पोल त्वरित हटवण्यात यावा, अशी जोरदार मागणी महावितरण प्रशासनाकडे केली आहे.

## विशेष संपादकीय

## हिंदू प्रकाश वार्ता राष्ट्रहित साधेल सर्वथा.. !

...पान - 1 वरून पुढे ->

योग्य पद्धतीने केला नाही तर समाजाला योग्य दिशा मिळणार नाही हे आम्ही जाणून आहोत. मुद्रित माध्यम क्षेत्रात सोशल मिडीया आणि डिजीटल मिडीयाच्या वाढत्या प्रसारामुळे संकट काही प्रमाणात ओढावले आहे. छापील वृत्तपत्रांना आज वाचकसंख्या पूर्वीप्रमाणे लाखोंच्या घरात मिळत नाही, हे वास्तव आहे. वर्तमानपत्र चालविणे खर्चिक आणि अवघड बाब आहे. लिखित साहित्य हे दीर्घकाळ टिकते आणि संदर्भ, संग्रही राहते. अडचणींवर मात करून पुढे जाणार आहोतच. दैनिक सुरु ठेवतानाही अनंत अडचणी असतात, याचीही जाणीव आहे. परंतु याचा ताण घेण्याचे कारण नसेल, कारण आम्ही माणसं जोडणार आहोत! आम्ही प्रखर राष्ट्रवाद स्वीकारत आहोत. राष्ट्रहिताशी कसलीही तडजोड आम्ही करणार नाही, शेतकरी, कष्टकरी, तरुण वर्ग, महिलांवर होणाऱ्या अन्यायावर आम्ही आवाज उठवणार आहोत. याच भांडवलावर आमची वाटचाल सुरू राहील. आमच्यासमोर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा प्रखर, तेजस्वी पत्रकारितेचा आदर्श असेल, हा आदर्श शक्य होईल तेवढा आम्ही आमच्या वाटचालीतून जपणार आहोत. स्वाभिमान जपून ही आमची वाटचाल सुरु राहील . सत्ताधारी व विरोधकांना जनहित समजून सांगण्याचा आमचा प्रयत्न राहील. सत्ताधारी आणि विरोधक चुकले तर तर त्यांना दिशा देऊ, सत्ताधाऱ्यांनी घेतलेल्या चांगल्या निर्णयाची प्रशंसा आम्ही करत राहू . शेतकरी नेहमीच संकटात येत असतो. शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे वाढवायचे याकडे प्रकाश टाकणार आहोत. शेतकरी आत्महत्या, दहशतवाद, बेरोजगारी, गुन्हेगारी, भ्रष्टाचार असे अनेक आमच्यासमोर चिंतेचे विषय आहेतच यावर आम्ही नित्यनियमाने प्रकाश टाकणाार आहोत. आम्हाला जाणीव आहे की, वृत्तपत्र हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. लोकशाही अधिक सशक्त आणि परिणामकारक होण्यासाठीही भूमिका सार्थ ठरविण्यासाठी आम्ही धडपडत राहू . पत्रकारितेत चांगले काम करणाऱ्याना आमच्या वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर संधी उपलब्ध करून प्रोत्साहन देत राहू. सोशल मिडिया, डिजीटल मिडिया प्रमाणेच आजही प्रिंट मिडियावर आजही लोकांचा विश्वास आहे. हा विश्वास सार्थ ठरवत राहू . राज्यात दररोज शेकडोंच्या संख्येत वृत्तपत्र असतानाही आम्ही धाडस दाखवत आहोत . लोकांना काय आवडते, लोकांची अभिरुची कशा प्रकारची आहे ? याचा अंदाज घेऊन विचारांची मांडणी , सोप्या भाषेत करत राहू . छत्रपती संभाजीनगरची व मराठवाड्याची मानसिकता विचारात घेऊनच राष्ट्रहिताचे विचार व संदेश आम्ही घराघरात पोहोचवूत . भारताची वाटचाल आत्मनिर्भरतेची आहे, हे आम्ही सांगत राहू . बाळशास्त्री जांभेकर , लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे , डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अच्युत बळवंत कोल्हटकर, कृष्णराव अर्जुन केळुसकर, न. चिं. केळकर , शंकर वासुदेव किर्लोस्कर, प्रभाकर पाध्ये यांचा आदर्श समोर ठेवून त्यांच्या विचारांचा वारसा जपत राहू! महाराष्ट्राचे मोठेपण जगाला सांगत राहू ! एका आगळेवेगळ्या वृत्तपत्राचा ठसा आम्ही अल्पावधीत उमटवू, हा आत्मविश्वास आम्ही बाळगून आहोत.

## संशोधन पद्धतीवरील राष्ट्रीय कार्यशाळेस देशविदेशातील संशोधकांचा उत्तुंग प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी)- येथील स.भु. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फेâ 'संशोधन पद्धती' विषयावर आयोजित ऑनलाइन राष्ट्रीय कार्यशाळेस देशविदेशातील संशोधक आणि तज्ज्ञांचा उत्तुंग प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेने स. भु. संस्थेचा झेंडा सातासमुद्रापार फडकवला आहे.

प्राध्यापक आणि संशोधक विद्यार्थ्यांना संशोधनातील आधुनिक तंत्रे आणि नीतीतत्त्वांची ओळख करून देणे हा या कार्यशाळेचा उद्देश होता. कार्यशाळेचे उद्घाटक संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे यांनी बदलत्या शैक्षणिक प्रवाहात संशोधनाचे महत्त्व अधोरेखित केले आणि विद्यार्थ्यांना नवनवीन आव्हाने स्वीकारण्याचे आवाहन केले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वाणिज्य विभागप्रमुख डॉ. फराह नाझ गौरी यांनी संशोधनातील तांत्रिक बाबी आणि अचूक मांडणीवर मार्गदर्शन केले.

पहिल्या सत्रात गुजरातच्या सरदार पटेल विद्यापीठातील व्यवस्थापनशास्त्र विभागप्रमुख डॉ. यज्ञेश दलवाडी यांनी 'वाणिज्य विषयात संशोधनाचा आधार' यावर उत्कृष्ठ मांडणी केली. दुसऱ्या सत्रात उत्तराखंडच्या रूरकी विद्यापीठातील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या व्यवस्थापनशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. विभा वर्मा यांनी 'डेटा विश्लेषण आणि सांख्यिकीय साधने' या तांत्रिक विषयावर मार्गदर्शन केले. कोलकाता येथील सेंट झेवियर महाविद्यालयाचे डॉ. सुमंता दत्ता यांनी 'संशोधनातील नैतिकता, केले जाणारे पालन व भविष्यातील संधी' या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे यांनी संशोधनाचा दर्जा सुधारण्यावर भर दिला, तर समन्वयक डॉ. दिलीप चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. सहसमन्वयक डॉ. फिरोज बेग यांनी कार्यशाळेचा सविस्तर आढावा सादर केला.

या कार्यशाळेत २८ राज्यांतील १२६१ हून अधिक संशोधक विद्यार्थी-प्राध्यापकांसह विदेशी विद्यापीठांतील संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला. संयोजन समितीच्या नियोजनामुळे ही राष्ट्रीय कार्यशाळा यशस्वी झाली.

## खुलताबाद येथे आ. प्रशांत बंब यांच्या उपस्थितीत 'समस्या निवारण' शिबिराचे आयोजन

हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

खुलताबाद १८ एप्रिल मतदारसंघातील नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि त्यांच्या तक्रारींचे जागेवरच निवारण करण्यासाठी आमदार प्रशांत बंब यांच्या वतीने विशेष 'समस्या निवारण' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



हे शिबिर येत्या सोमवारी, २० एप्रिल २०२६ रोजी खुलताबाद येथील तहसील कार्यालयात संपन्न होणार आहे. मतदारसंघातील सामान्य जनतेला दैनंदिन जीवनात अनेक शासकीय किंवा स्थानिक समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्या थेट लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचाव्यात आणि त्यावर प्रभावी उपाययोजना व्हाव्यात, या उद्देशाने या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.,

२० एप्रिल सोमवार वेळ: सकाळी १०:३० ते दुपारी ४:०० वाजेपर्यंत तहसील कार्यालय, खुलताबाद.

या शिबिरात सहभागी होणाऱ्या नागरिकांनी आपल्या तक्रारी किंवा अर्ज लेखी स्वरूपात सोबत आणावेत, जेणेकरून त्यावर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करणे सोपे होईल. रस्ते, पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य किंवा इतर कोणत्याही शासकीय योजनांशी संबंधित अडचणींबाबत नागरिक आपले गाऱ्हाणे मांडू शकणार आहेत. मतदारसंघातील जास्तीत जास्त नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या समस्यांचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन आमदार प्रशांत बंब यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## एमजीएम विद्यापीठात नि:शुल्क संस्कृत भाषा कार्यशाळेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर,दि.१७ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठात संस्कृत भाषा शिकू इच्छिणाऱ्यांसाठी संस्कृत भारती आणि एमजीएम विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन अँड फॉरेन लँग्वेजेस यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय संस्कृत भाषाबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा दिनांक २० एप्रिल २०२६ ते २४ एप्रिल २०२६ दरम्यान सायं. ४.०० ते ५.३० या वेळेत आइनस्टाईन सभागृह येथे संपन्न होणार आहे. ही कार्यशाळा छत्रपती संभाजीनगरातील सर्व नागरिकांसाठी खुली असून सहभागी होण्यासाठी किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे ही कार्यशाळा पूर्णपणे नि:शुल्क आहे. मात्र, सहभागासाठी पूर्वनोंदणी अनिवार्य आहे.

या कार्यशाळेत अनुभवी मार्गदर्शक म्हणून सौ.शुभदा धांडे मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संस्कृत विषयाच्या प्रा.डॉ. प्रज्ञा कोनार्डे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी ८१४९१५९२४२ /९३७१७१४२५९ या भ्रमणध्वनींवर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकाकडून करण्यात आले आहे.

## आसूस तर्फे 'ड्रॉप झोन' नेटवर्कचा विस्तार

पुणे : आपल्या 'ड्रॉप झोन' उपक्रमाच्या यशस्वी शुभारंभानंतर आसूस इंडिया ने देशभरातील आपल्या आणखी २२ स्टोअर्समध्ये हा उपक्रम सुरु करत या उपक्रमाच्या विस्तारीकरणाची घोषणा केली आहे. देशभरातील ग्राहकांना खरेदीपश्चात सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवेला पाठबळ देण्याबाबतची आपली वचनबद्धता कंपनीने या उपक्रमातून आणखी मजबूत केली आहे. ग्राहकांचा उत्पादन वापराचा अनुभव अधिक उंचावण्यावर भर देत 'ड्रॉप झोन' उपक्रम ग्राहकांना त्यांचे लॅपटॉप दुरुस्तीसाठी 'आसस एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स'मध्ये जमा करण्याची सुविधा प्रदान करत आहे. यामुळे ग्राहकांना खास सर्व्हिस सेंटर्सवर जाण्याची गरज उरलेली नाही. विशेषतः उदयोन्मुख बाजारपेठांमधील उपलब्धता, दुरुस्तीसाठी लागणारा वेळ आणि सेवेतील स्पष्टता यासारख्या ग्राहकांच्या मुख्य समस्या सोडवण्यासाठीची आससची वचनबद्धता या विस्तारातून प्रकट होते.

## एमजीएममध्ये उद्या आंतर विद्यापीठ सायकलिंग स्पर्धेचा समारोप सोहळा

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ : असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू) आणि महात्मा गांधी मिशन विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रोड सायकलिंग स्पर्धेचा समारोप समारंभ उद्या, शनिवार दिनांक, १८ एप्रिल २०२६ रोजी दुपारी २ वाजता विद्यापीठातील आईनस्टाईन सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे.

या समारोप समारंभास भारतीय क्रीडा प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगरच्या उपसंचालिका डॉ.मोनिका घुगे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तसेच एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर यांची उपस्थिती राहणार असून देशभरातील विविध विद्यापीठांचे क्रीडा अधिकारी, प्रशिक्षक, सहभागी खेळाडू आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

चार दिवस चाललेल्या या स्पर्धेत देशभरातील विविध विद्यापीठांमधील सायकलपटूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उत्कृष्ट कामगिरी केली. या समारोप समारंभात विजेत्या खेळाडूंना सन्मानित करण्यात येणार आहे.

## फिजिक्सवालाच्या विद्यार्थ्यांनी मिळवले विक्रमी यश

हिंगोली - - शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) साठी आजचा दिवस उत्सवी ठरला, कारण तिच्या अनेक विद्यार्थ्यांनी सीबीएसई १० वी बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये उच्च गुण मिळवले, ज्यामध्ये काही विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळवले आहेत. अव्वल कामगिरी करणाऱ्यांमध्ये पंजाबच्या फजिल्का येथील वैभव अरोरा, गुजरात मधील अहमदाबाद येथील अमोलिक पंडिता आणि ओडिशातील भुवनेश्वर मधील आयुष्यमान मोहापात्रा यांनी १०० टक्के गुण मिळवून देशात पहिला क्रमांक मिळवला आहे.

## जि.प.सदस्या पुष्पाताई काळे यांची आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांची भेट




हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१८ एप्रिल |** सोयगाव तालुक्यातील घोसला,तिडका,बोरमाळतांडा, नांदगाव आदी गावांना सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टी मुळे जमीन खरडून गेल्याचा निधी पुरवणी यादी मंजूर करून बाधित शेतकऱ्यांना मिळावा या मागणीसाठी व आमखेडा गाव व सोयगाव शहरातून तुन जाणारी सोनानदीवर गावा साठी स्वरक्षणभीत उभारावी यासाठी जामनेर येथे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांची भेट घेऊन त्यांना निवेदनाद्वारे मागणी केली.यावेळी मंत्री गिरीश महाजन माहिती घेऊन त्वरित कारवाई करण्याचे आश्वासित केले.यावेळी सोबत तेजस्विनी ताई काळे,जिल्हा चिटणीस सुनील गावंडे,नगरसेवक राजेंद्र जावळे,ख.वि.संचालक मयुर मनगटे,प्रमोद पाटील,ख. वि.संचालक तथा भाजपा सोयगाव शहराध्यक्ष मंगेश सोहनी,सरपंच संजय आगे,विजय गव्हाड,घोसला येथील किशोर पाटील,समाधान पाटील,आदी उपस्थित होते.

## अजिंठा घाटात सकाळी एका ट्रकचे ब्रेक निकामी झाले असल्याने चालकाने प्रसंगावधान राखून ट्रक डोंगराच्या कड्यावर आदळला

हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**फर्दापूर|** फर्दापूर . छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात पुन्हा एका ट्रकचे ब्रेक निकामी झाले शुक्रवारी सकाळी दहा वाजेच्या सुमारास ए पी 37 टि डी 5729 हा तामिळनाडू हुन जळगाव आंबा घेऊन जात असताना यांचे ब्रेक निकामी झाले



असल्याने चालकाने प्रसंगावधान राखून ट्रक डोंगराच्या कड्यावर आदळला असुन यात ट्रकच्या केबिन चे नुकसान झाल्या असून किल्नर किरकोळ जखमी झाला असून ही माहिती फर्दापूर पोलीस स्टेशन मध्ये माहिती मिळताच पोलिस कर्मचारी आकाश गवळे व नरेंद्राचार्य महाराज संस्थान यांच्या रुग्णवाहिका चालक केदार पवार यांनी घटनास्थळी जाऊन येथे होणाऱ्या ट्राफिक जाम ला सुरळीत रस्ता मोकळा करून दिला यावेळी एक तास ट्रॅफिक जाम झाली होती परंतु यांनी अजिंठा येथून मेकानिक बोलून या ट्रकचे ब्रेक चे काम करुन हा घाटाच्या खाली आणली आणि वाहतूक सुरळीत करण्यात आली

## अनिता क्षीरसागर यांना रसायनशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान

छत्रपती संभाजीनगर, दि. १ ८ (प्रतिनिधी)- जालना येथील अनिता काशिनाथ क्षीरसागर यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने रसायनशास्त्र विषयात विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांनी डॉ. सुनील रामराव मिरगणे यांच्या मार्गदर्शनाखाली 'सिंथेसिस, कॅरेक्टरायझेशन अॅण्ड अॅण्टिमायक्रोबियल अॅक्टिव्हिटी ऑफ सम बायोलॉजिकली पोटंट नॅनोपार्टिकल्स' या विषयावर प्रबंध सादर केला होता. विद्यापीठाने त्यांच्या संशोधनाला मान्यता देऊन त्यांनी पीएच. डी. पदवी प्रदान केली.

# हिंदू धर्म टिकवण्यासाठी संतांची संगत कथा कीर्तन सेवेचे आयोजन करा निर्व्यसनी रहा हजारो भक्तांच्या उपस्थितीत . अभयनंद गिरीजी महाराज

हिंदू प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**खुलताबाद दि १८ एप्रिल |** स्वामी भागवत नंद गिरीजी १००८ महामंडलेश्वर कैलास आश्रम वेरूळ यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि १० एप्रिल ते १६ एप्रिल या शुभ पर्वावर शिव महापुराण कथा महाउत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कथा प्रवक्ते परमपूज्य गोवत्सल श्री राधाकृष्ण स्वामी महाराज जोधपुर राजस्थान यांनी आपल्या रसाळ वाणीतून श्री भागवत कथेचे महत्व भाविकांना . भक्तिमार्ग धर्म संस्कार कर्तव्य गोसेवा सदाचार जीवनातील महत्त्वाचे मूल्याचे महत्व आलेल्या हजारो भाविकांना सांगितले. या कार्यक्रमात विविध धार्मिक कार्यक्रमाचे या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते



दि १७ एप्रिल रोजी कैलास आश्रम प्रमुख अभय नंद गिरीजी महाराज यांच्या काल्याचे किर्तन सेवेचे आयोजन कैलास आश्रम येथे सकाळी १० ते १२ या वेळेत महाराष्ट्राच्या सर्व भागात भाविक भक्तासाठी करण्यात आले होते या कीर्तन सेवा सेवेत महाराजांनी संगत आचार विचार हिंदू सनातन धर्म गोसेवा कथा कीर्तन महाउत्सव साजरे करा असे आवाहन आलेल्या भक्तांना आपल्या कीर्तन सेवेतून केले. आज माझे गुरुवर्य भागवत नंदगिरी जी महाराज यांच्या पुण्यतिथीचे किर्तन सेवा मी आलेल्या सर्व थोर संत महंत यांच्यासमोर करत असून यातून मला माझ्या गुरुवर्यांचे दर्शन होत असल्याचे सांगितले

या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक सोहळ्यासाठी गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे भाजपाचे आमदार प्रशांत बंब यांचे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कार्यक्रमा च्या आयोज साठी मोठा सिंहाचा वाटा असल्याचा उल्लेख अभय नंद गिरीजी महाराज यांनी केला तसेच आपले मित्र मंडळी ही धार्मिक कार्यासाठी तन-मन-धनाने विशेष सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले( या कार्यक्रमासाठी आमदार प्रशांत बंब यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप प्रसंगी आमदार प्रशांत बंब यांनी गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघात आपल्या वतीने व मित्रमंडळीच्या सहकार्याने दोन्ही तालुक्यातील आश्रमासाठी व शेतकरी यांना गावरान ५०० गाईचे पहिल्या टप्प्यात वाटप करण्याचा भविष्यात मानस असल्याचे कैलास आश्रम येथे कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले मी चार टर्मचा आमदार असून माझ्या मतदारसंघातील प्रत्येक देवस्थान आश्रम साधुसंत महंत यांना जे शक्य होईल ती मदत आपण आमदार म्हणून व आपल्या परिवाराकडून मित्र परिवाराकडून आजपर्यंत करत आलो असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थित छत्रपती संभाजी नगर भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे पंचायत समिती सभापती सुनिता संजय खंडागळे तालुका अध्यक्ष प्रकाश चव्हाण उपनगराध्यक्ष नवनाथ बारगळ वेरूळ गावचे सरपंच कुसुम प्रकाश पाटील मिसाळ विकास कापसे दिनेश अंभोरे गणेश व्यवहारे सतीश दांडेकर परसराम बारगळ सागर मातकर. यांच्यासह संत महंत यांच्या प्रमुख उपस्थितीत काल्याचे दहीहंडीने कार्यक्रमाचा समारोप झाला आलेल्या सर्व मान्यवरांचे कैलास आश्रमाचे वतीने ह भ प प्रख्यात कीर्तनकार गोकुळ महाराज वाकळे भडजीकर यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे आश्रमाचे वतीने आभार मानले

## आठवणी, मैत्री आणि संस्कारांचा संगम; वेरूळ जैन मंदिरात स्नेहसंमेलन"

### "माजी विद्यार्थ्यांचा उत्सव: वेरुळमध्ये एकदिवसीय स्नेहसंमेलन २० एप्रिलला"

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) – श्री पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुल, वेरुळ आणि गुरुदेव समंतभद्र विद्या मंदिर, यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय माजी विद्यार्थी स्नेह संमेलन – २०२६ चे भव्य आयोजन सोमवार, दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी करण्यात आले आहे. या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने गुरुकुलाशी निगडित असलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचा, जुन्या आठवणींना उजाळा देण्याचा आणि गुरुकुलाच्या प्रगतीचा आढावा घेण्याचा हेतू आहे.

गुरुकुलाची स्थापना प. पूज्य गुरुदेव १०८ समंतभद्र महाराज व प. पूज्य आचार्य १०८ आर्यनंदीजी महाराज यांच्या आशीर्वादाने सुमारे १९६२ साली झाली असून, गेल्या अनेक दशकांत या संस्थेने हजारो विद्यार्थ्यांना संस्कार, शिक्षण आणि जीवनमूल्ये दिली आहेत. लहानशा स्वरूपात सुरू झालेले हे गुरुकुल आज मोठ्या व व्यापक रूपात विकसित झाले असून, अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या स्नेहसंमेलनात प. पू. आचार्य १०८ समयसागरजी महाराज यांच्या मंगल आशीर्वादाने होनार आहे. यावेळी मुनि श्री नियमसागर महाराज व सुपार्श्वसागर महाराज याचा सानिध्यात विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे,अशी माहिती दिनेश गंगवाल – संस्था अध्यक्ष

डॉ. प्रेमचंदजी पाटणी – महामंत्री व शाळा समितीचे अध्यक्ष मदनलाल पाडे व मुख्याध्यापक गुलाबचंद बोराळकर यानी दिली. कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांचा सत्कार, संवाद सत्र, आठवणींचा प्रवास, तसेच गुरुकुलाच्या विकासासाठी चर्चा अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे वेळापत्रक (रूपरेषा)

सकाळी ७.०० ते ८.०० – अभिषेक, पूजन

सकाळी ८.०० ते ९.०० – चहा, नाश्ता व मैत्रीसंवाद

सकाळी ९.०० ते १२.०० – उद्घाटन व स्नेहसंमेलनाचे पहिले सत्र

दुपारी १२.०० ते १.३० – भोजन व संवाद

दुपारी १.३० ते २.४५ – नवीन जिनमंदिर वेदी शिलान्यास

दुपारी ३.०० ते ५.३० – दुसरे सत्र व समारोप

सायंकाळी ५.३० ते ६.३० – भोजन व मैत्रीसंवाद

सायंकाळी ७.०० – जिनमंदिरातील भक्ति व आरती …

**कार्यक्रमातील प्रमुख मान्यवर |** मा. श्री. दिनेश गंगवाल –संस्था अध्यक्ष, डॉ. प्रेमचंदजी पाटणी – महामंत्री

उद्घाटक प्रथम सत्र मा. श्री. जितेंद्रजी पापळकर – विभागीय आयुक्त

द्वितीय सत्र उद्घाटक सतीशजी संघई – अध्यक्ष, जैन गुरुकुल कारंजा (लाड)